
# संसार हा सुखाचा

हिरकांत कळगुटकर



# संसार हा सुखाचा

हिराकांत कलगुटकर

RAMANATH PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date..................
ESTD. 1981

मॅजेस्टिक

मूल्य पाच रुपये

नाट्यपरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र : डी. आर. एम. १००५।७१

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपट-कथानकाचे, नभोवाणी रूपांतराचे, पुढील आवृत्तीचे आदी सर्व हक्क **सौ. मनीषा कलगुटकर** ( गंगाभुवन, रूम नं. २. तुरेल पाखाडी रोड, मालाड ( पश्चिम ), मुंबई ६४ ) यांच्या स्वाधीन असून त्यांच्या आगाऊ परवानगीवाचून या नाटकाचा प्रयोग वा एखादा प्रवेश, कोणत्याही व्यक्तीस वा संस्थेस सादर करता येणार नाही असा कोणी प्रयत्न केल्यास वा केलेला आढळल्यास त्या व्यक्ती व संस्थेवर कायदेशीर इलाज केला जाईल.

प्रथमावृत्ती : ऑक्टोबर १९७१

मुखपृष्ठ : नरेंद्र भुर्के

प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई ४

मुद्रक : वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय ( प्रा. ) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे ३०

या संसारी दुनियेत सुखाच्या हिंदोळ्यावर बसून झोके घेणं क्वचितच एखाद्याच्या नशिबी येतं; बहुतेकांना हा संसार सजवताना तारेवरची कसरतच करावी लागते. पण असाही संसार सुखाचा मानणारी स्वप्नवेडी माणसं इथं आढळतात; माझाही असाच तारेवरचा संसार सजवणाऱ्या माझ्या प्रिय पत्नीस–
**सौ. मनीषा कलगुटकर**
हीस प्रेमपूर्वक –

‘संसार हा सुखाचा’ या नाटकाचा प्रथम प्रयोग श्रीरंगप्रसाद या नाट्यसंस्थेने दि. २९ जुलै १९७१ रोजी रात्रौ ८–३० वाजता शिवाजी मंदिर, दादर येथे सादर केला त्यावेळी खालील कलाकारांनी या प्रयोगात भाग घेतला होता.

| | | |
|---|---|---|
| अरुण परांजपे | : | अरुण सरनाईक |
| राजाभाऊ जोशी | : | राजा नेने |
| विजया दिघे | : | सुमन आरेकर |
| शरद दिघे | : | शशिकांत शिर्सेकर. |
| मंदा चंदावरकर | : | रजिता ठाकूर |
| बाबासाहेब | : | जयवंत पवार |
| हिम्मत बहाद्दर | : | हिराकांत कलगुटकर |

| | | |
|---|---|---|
| दिग्दर्शक | : | रामचंद्र वर्दे |
| पार्श्वसंगीत | : | दत्ता डावजेकर. |
| नेपथ्य व प्रकाश | : | सखाराम भावे |
| ध्वनिसंयोजक | : | श्रीकृष्ण सहस्रबुद्धे |
| रंगभूषा | : | शांताराम विचारे |
| वेषभूषा | : | नारायण कदम |
| निर्मिती-व्यवस्था | : | वसंत इंगळे |
| रंगमंच व्यवस्था | : | लक्ष्मण, कृष्णा, सालोमन. |
| प्रसिद्धी | : | वी. वाय. पाध्ये |
| स्थिर चित्रे. | : | प्रकाश फोटो स्टुडियो |
| निर्मिती-सूत्रधार | : | सौ. मनीषा कलगुटकर |

## संसार थाटण्यापूर्वी

‘संसार हा सुखाचा’ हे माझ्या नवीन नाटकाचं शीर्षक वाचून माझ्या अनेक हितचिंतकांनी आश्चर्य व्यक्त केलं! मी विचारलं, ‘का बुवा? तुमच्या चेहऱ्यावर हे प्रश्नचिन्ह का उमटलं?’ माझे हितचिंतक म्हणाले, ‘हिराकान्त, जग किती झपाट्यानं पुढं जातंय! माणूस चंद्रावर पोचला. मंगळावर जायचे बेत आखतोय. तेच कशाला! मराठी रंगभूमीवर देखील केवढी क्रांती झालीय?’

मी मख्खपणे विचारलं, ‘कोणती?’

माझे हितचिंतक मला हसत म्हणाले, ‘अरे बाबा, मराठी रंगभूमीवरची पूर्वीची शालीनता संपली. आज हीच रंगभूमी ॲडव्हान्स जाऊ लागलीय. स्त्रीवर केलेल्या बलात्काराचं प्रात्यक्षिक तिच्या पृष्ठभागावर लाल भडक डागानं दाखवण्याचं कार्य आजची मराठी रंगभूमी करीत आहे. सख्ख्या बंधुभगिनीचा अनिर्बंध संबंध आजची मराठी रंगभूमी दाखवीत आहे. स्वतःची विषयवासना भागवण्याकरिता आजच्या तरुण मुली स्वतः होऊन कुंटणखान्यात जातात, याचे भीषण नाट्य आजची मराठी रंगभूमी दाखवीत आहे!’

मी थंडपणे विचारलं, ‘बरं मग?’ माझे हितचिंतक माझ्या थंड प्रश्नावर वैतागून म्हणाले, ‘मराठी रंगभूमी अशा क्रांतीच्या उंबरठ्यावर असताना तूं मात्र ‘संसार हा सुखाचा’ हे कौटुंबिक जिव्हाळ्याचं नाटक लिहितोस?’

आता मात्र मी स्मित करीत म्हणालो, ‘लेको! आजची नवी रंगभूमी, आजचा समाज किती हीन स्थितीला पोचला आहे हे दाखवण्याची धडपड करीत असताना हाच समाज पूर्वी कोणत्या थोर मूल्यांची जपणूक करीत होता, याचं उदात्त चिंतण दाखवण्याचा मी प्रयत्न करतोय हे माझं चुकलं का? अरे बाबांनो नाण्याला जशा दोन बाजू असतात तशा समाजाला! समाजाची एक बाजू आजची ॲडव्हान्स रंगभूमी दाखवतेय, मग दुसरी

बाजू कुणी तरी दाखवायलाच हवी, आणि ती दाखवण्याचा मी थोडाबहुत प्रयत्न करतोय. माझे हे प्रयत्न एकाकी असतील, अस्पष्ट असतील, कदाचित अपूर्ण असतील; पण माझे हे प्रामाणिक प्रयत्न आहेत एवढं तरी कबूल कराल की नाही ? '

माझ्या या उद्‌गारावर माझे हितचिंतक काही बोलले नाहीत. तोंड वेडीवाकडी करीत ते निघून गेले. आणि मग माझ्या नऊ वर्षांच्या नाट्य-लेखन-संसाराकडे मी मागं वळून पाहू लागलो.

माझं पहिलं नाटक ' चोर सोडून संन्यासी ' हे फार्सवजा विनोदी नाटक होतं. व्यावसायिक रंगभूमीवर हे नाटक तग धरू शकलं नाही. परंतु हौशी मंडळींनी या नाटकाचे शेकडो प्रयोग केले. त्यानंतर मी लिहिलं, ' माझी बायको माझी मेहुणी ' या मेहुणीचा इतिहास नाटच रसिकांना चांगलाच माहीत आहे. या नाटकानं उत्पन्नांचे उच्चांक प्रस्थापित केले. निर्मात्याला, कलाकारांना त्यांच्या योग्यतेपेक्षा अधिक पैसे मिळाले; पण लेखक म्हणून माझ्या पदरी काय पडलं ? टीका, जहाल टीका. हा लेखक 'अश्लील लिहितो, पांचट लिहितो हीच टीका सर्वत्र ऐकू येऊ लागली ! वास्तविक हे नाटक फालतू असेल, पण ते अश्लील मुळीच नाही. त्यापेक्षा अनेक अश्लील नाटकं मराठी रंगभूमीवर आलेली आहेत. अजून येताहेत पण ती चालली नाहीत. मेहुणी लोकप्रिय झाली; हीच अनेकांची पोटदुखी होती.

या नाटकानंतर ' लेक लाडकी या घरची ' हे माझं विनोदी नाटक तुफान चाललं. केवळ निर्मात्या कलाकारांनाच नव्हे तर मला लेखक या नात्यानं या नाटकानं भरपूर पैसा दिला; परंतु तरीही दर्जेदार नाटककारांच्या पंक्तीत प्रवेश करायला मला मोकळीक मिळाली नव्हती. त्या बाबतीत मला अजून तरी वाळीतच टाकलेलं होतं.

या नाटकानंतर मी स्वत:ची नाट्य संस्था स्थापन करून ' कशाला उद्याची बात ' हे स्वतंत्र नाटक लिहून सादर केलं. आणि टीकाकारांनी मला एका रात्रीत दर्जेदार, घरंदाज, उत्कृष्ट नाटककार म्हणून प्रसिद्धी दिली; परंतु टीकाकारांनी वाखाणलेल्या या नाटकाकडे प्रेक्षकांनी मात्र पाठ केली. कारण त्यांचं तेच जाणोत; परंतु मी धीर सोडला नाही. ' कन्या ही सासुरासी जाये ' हे नाटक लिहून सादर केलं आणि या नाटकाबाबत टीकाकार आणि प्रेक्षकांचं



एकमत झालं. फार प्रसिद्धी आणि थोडाबहुत पैसा या नाटकानं माझ्या पदरात टाकला, त्यानंतरच्या ' बाळा गाते तुज अंगाई ' या नाटकानं पैसा दिला नसला तरी त्यानं माझ्या लिखाणाचं कौतुक होण्याचं समाधान मिळवून दिलं.

आणि आता हा ' संसार हा सुखाचा. ' सुरवातीलाच सांगतो हे कौटुंबिक जिव्हाळ्याचं नाटक नाही. या नाटकातील संसार हा शब्द केवळ नवराबायकोचा ' संसार ' या अर्थी मुळीच वापरलेला नाही. संसार याचाच अर्थ जग. हे जग सुंदर आहे. सुखाचं आहे अशा अर्थानं हे मी या नाटकाला नाव दिलं आहे. संपूर्ण नाटक वाचल्याखेरीज या नावाचा अर्थ ध्यानात येणार नाही.

असो. हे नाटक रंगभूमीवर येण्यासाठी माझ कलाकार, हितचिंतक यांनी जे अमोल सहाय्य केलं त्याचं ऋण शब्दानं व्यक्त करणं अवघड आहे. तरीही व्यवहारात औपचारिकपणा हवा असतो म्हणून त्यांचे मी आभार मानतो. अधिक काय लिहू ?

दि. २१ ऑगस्ट १९७१ — हिराकांत कलगुटकर

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

मुंबईच्या उपनगरातील एक भाग. वेळ रात्रीची. दूरवर घड्याळात अकराचे टोले पडतात. रंगमंचावर तसा अंधार असला तरी, एका खिडकीतून स्ट्रीट लॅम्पचा प्रकाश थोडासा डोकावतोय. कुठंतरी भजन चाललं आहे. त्याचा अस्पष्ट ध्वनी खिडकीतून ऐकू येतोय.

काही क्षणांनंतर अरुण झोकांड्या खात ठुमरीचे चरण गुणगुणत रंगमंचावर येतो. स्विच ऑन करतो— रंगमंच प्रकाशानं उजळून निघतो; आणि त्या जागेचं नीट स्वरूप ध्यानात येतं.

रंगमंचावर एक मजली बंगलीतल्या पहिल्या मजल्याचा हॉल मांडलेला आहे. डाव्या व उजव्या भिंतीत एकेक दार व एकेक पॅसेज आतील बाजूस जाण्यास दिसत आहे. समोरच्या भिंतीत एक खिडकी, पॅसेजचं दार, पलिकडे पॅसेज आणि पॅसेज-मधून बाहेर जाण्याचा रस्ता दिसतो. हॉलमध्ये जुजबी सामान मांडलेलं; मांडलेलं म्हणण्यापेक्षा अस्ताव्यस्त पडलेलं दिसतं.

अरुण स्विच ऑन करून धडपडत कॉटकडे येतो. हातातली पत्रं न्याहाळतो, पण त्यावरची अक्षरं त्याला नीट दिसत नाहीत. म्हणून पत्रं कॉटवर टाकून तसाच कपड्यांनिशी कॉटवर अंग टाकतो. एक क्षण जातो न जातो तोच कॉलबेल वाजू लागते. अरुण कॉटवर पडल्या पडल्याच अंग घुसळतो. पण कॉलबेल जोरजोराने वाज लागते. आणि पाठोपाठ

'दार उघडा, दार ' अशी राजाभाऊंची हाक ऐकू येते. अरुण धडपडत उठतो. स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करतो आणि पॅसेजमध्ये जातो. काही क्षणांनंतर अरुण भिंतीचा किंचित आधार घेत आत येतो. पाठोपाठ राजाभाऊ येतात. त्यांच्या एकंदर हावभावावरून ते खूप संतापले आहेत. अरुण मात्र शांतपणं विचारतो.

**अरुण** : राजाभाऊ, अशा अपरात्री ?

**राजाभाऊ** : ( कुत्सित स्वरात ) निशाचराला आणखी कधी भेटायचं ?

**अरुण** : निशाचर ? ( खोटं हसत ) राजाभाऊ तुम्ही सुद्धा कधी कधी छान विनोद करता !

**राजाभाऊ** : ( सूर सधाचाच ) तुमच्याइतका खास नाही !

**अरुण** : म्हणजे ?

**राजाभाऊ** : ( चेक दाखवीत ) हा बघा तुमचा विनोद ! ( अरुण चपापतो ) बँकेतून साभार परत आला ! कारण तुमच्या खात्यात पैसे नाहीत !

**अरुण** : ( खोटचा दिलगिरीच्या स्वरात ) सॉरी हं राजाभाऊ ! आज बँकेत गेल्यावर मला हे समजलं होतं !

**राजाभाऊ** : ( आश्चर्यानं ) बँकेत गेल्यावर ? खरं म्हणजे हा चेक मला देतानाच तुम्हाला ठाऊक होतं, हा चेक परत येणार !

**अरुण** : छे छे, राजाभाऊ, तुमचा गैरसमज होतोय !

**राजाभाऊ** : ( उसळून ) गैरसमज ? स्वतःच्या खात्यात हजार पैसे नसताना तुम्ही मला हजार रुपयांचा चेक देता आणि वर माझाच गैरसमज झाला म्हणता !

**अरुण** : हो हो, गैरसमज ! राजाभाऊ हा मी तुम्हाला पोस्ट डेटेड चेक दिला होता ! कारण एका पार्टीकडून मला तीन हजार रुपये यायचे होते. त्यानंही मला चेक दिला होता... याच तारखेचा ! तो चेक पास झाला नाही.

**राजाभाऊ** : म्हणून हा चेक नापास झाला !

**अरुण** : ( स्मित करीत ) नॅचरली !

**राजाभाऊ** : ( आश्चर्यानं ) काय बदमाष माणूस आहेस तू ! मला फसवतोस ! अरे मी तुझं बारसं जेवून बसलोय ! हा चेक परत आल्यावर



मी तुझ्या खात्याची चौकशी केली. गेल्या महिन्याभरात तुझ्या खात्यावर तू कोणताही चेक भरलेला नाहीस !

**अरुण** : ( चपापून ) पण त्याचं काय आहे राजाभाऊ---

**राजाभाऊ** : एक शब्द बोलू नकोस ! चालता हो माझ्या घरातून– आता या क्षणी !

**अरुण** : या क्षणी, कुठं जाऊ ?

**राजाभाऊ** : मसणात ! ही एक सभ्य माणसाची बंगली आहे. धर्मशाळा नव्हे !

**अरुण** : ( समजावणीच्या स्वरात ) राजाभाऊ, माझं ऐका...

**राजाभाऊ** : तुझी कोणतीही सबब मी ऐकून घेणार नाही. ही माझी वडिलोपार्जित बंगली आहे. इथं घरंदाज माणसाला स्थान मिळतं, तुझ्यासारख्या लफंग्या, बदमाष माणसाला नव्हे ! काय काय थापा मारल्यास तू मला ! आठवतात ?

**अरुण** : (उत्सुकतेनं) सांगा, सांगा !

**राजाभाऊ** : मोठचा रुबाबात इथं आलास, म्हणालास.. मी आफ्रिकेतून आलोय... बिझनेस करण्यासाठी ! मी लवकरच इथं प्लॉट घेणार आहे, बंगला बांधण्यासाठी ! तोवर राहण्यासाठी मला जागा हवीय...माझ्याकडे जोडजोखीम असल्यामुळे मी हॉटेलात राहू इच्छीत नाही. तुमची ही बंगली मोकळी असल्याचं समजलं म्हणून आलोय. थोडे दिवस राहीन. महिना पाचशे रुपये भाडं देईन...दोन महिन्यांचं भाडं अगाऊ देतोय– असं म्हणून हजार रुपयांचा चेक दिलास आणि खुशाल इथं पथारी टाकलीस ! मला बोलूच दिलं नाहीस ! ( किंचित थांबून ) मग मी विचार केला, परदेशी माणूस, दिसायला सभ्य आणि बिझिनेस मॅन, राहू द्यावा त्याला इथं ! पण आता तुझं खरं स्वरूप लक्षात आलं ! तू डॅंबिस आहेस !

**अरुण** : ( शांतपणे ) राजाभाऊ, लॅंगवेज प्लीज !

**राजाभाऊ** : अरे जारे ! एकदा नव्हे–हजारदा म्हणेन, तू डॅंबिस आहेस. एक नंबरचा लफंगा आहेस, चोर आहेस, मवाली आहेस तू...

**अरुण** : ( ओरडून ) राजाभाऊ ! डोंट टॉक मोर एनी सिंगल वर्ड ! मी तुमच्याइतकाच, किबहुना तुमच्यापेक्षा जास्त सभ्य आहे !

**राजाभाऊ** : ( चेक दाखवीत ) अँ हँ हँ . . . ते दिसतंच आहे . . . हा तुमचा सभ्यपणा !

**अरुण** : (शांत होत) राजाभाऊ, दिसतं तसं नसतं ! म्हणूनच तुम्ही माझा अपमान केलात. तुम्ही समजता तसा मी कुणी आवारा नाही. मीही एका सुसंस्कृत घराण्यात जन्माला आलोय. मीही लखपती बापाचा एकुलता एक मुलगा आहे ! तुमच्या या बंगलीसारख्या दहा बंगली मावतील एवढा भव्य माझा बंगला आहे. दिवसातून चार चार मोटारी मी वापरतो, तुमच्या या बंगलीएवढी तर माझी बेडरूम आहे. मी झोपतो तो पलंगच मुळी पाच हजारांचा आहे. बंगल्यात अंथरलेला गालिचा खास काश्मीरहून मागवलाय ! मी लिहायला बसतो ते रायटिंग टेबल दोन हजारांचं आहे. माझ्या पायातल्या एकेक सपाता शंभर शंभर रुपयांच्या आहेत. मी चांदीच्या ताटात जेवतो—

**राजाभाऊ** : ( कुत्सित स्वरात ) आणि मोत्याचा चारा खातो. सोनं उगाळून पितो . . . कुणाला सांगतोस हे शेखमहंमदी स्वप्न ?

**अरुण** : ( ठामपणे ) हे शेखमहंमदी स्वप्न नव्हे ! धिस इज् अ फॅक्ट ! राजाभाऊ, गोमंतकातील विख्यात उद्योगपती बाबासाहेब देशमुख हे नाव कधी कानावरून गेलंय का ?

**राजाभाऊ** : अनेक वेळा . . . एवढा धनाढ्य माणूस, पण निर्व्यसनी, प्रामाणिक आणि परोपकारीसुद्धा ! त्यांच्या परोपकाराचे अनेक किस्से आम्ही ऐकलेत ! काही दिवसांपूर्वी वाचलं होतं, त्यांचा एकुलता एक मुलगा अचानक घरातून नाहीसा झाला . . .

**अरुण** : आणि तोच मुलगा आज तुमच्यासमोर उभा आहे.

**राजाभाऊ** : ( चेष्टेनं ) कोण तू ?

( मोठमोठ्याने हसत सुटतात. अरुण शांतपणे उभा आहे. हसू आवरत राजाभाऊ पुढं म्हणतात— )

तुझ्यासारखा थापाड्या आजवर मी कुठंच पाहिला नव्हता. तू काय मला मूर्ख समजतोस ?

**अरुण** : ( मानभावीपणे ) ज्या अर्थी मी तुम्हाला माझ्या वडिलांच्या जागी पाहातो, त्या अर्थी तुम्ही मूर्ख खास नाही !

**राजाभाऊ** : आयुष्यात एवढंच शहाणपणाचं बोललास ! हे बघ, आता यापुढं एकही थाप न मारता इथून काळं कर ! तुला वाटखर्चासाठी हवे असतील तर पाच पंचवीस रुपये द्यायला तयार आहे मी.

**अरुण** : ठीक आहे राजाभाऊ, माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वास बसत नसेल तर तुम्हाला मनःस्ताप देणं, मला केव्हाही उचित वाटणार नाही. साहजिकच आहे. आजच्या दुनियेत खऱ्याला, आपण खरं आहोत असं ओरडून स्वतःची जाहिरात करावी लागते. आणि तरीही खऱ्याला खरं मानायला कुणीच तयार नसतो, कारण खोट्यालाच खरं समजून खऱ्याकडे पाठ करण्याची दुनियेला सवय झाली आहे. पतिव्रतेच्या तेजःपुंज मुखानं भारावून जाण्याऐवजी पतितेच्या रंगरंगोटी केलेल्या मुखड्याचं कौतुक करण्यातच आजची दुनिया स्वतःला धन्य मानते ! साहजिकच आहे, माझ्या बोलण्यावर तुमचा कसा विश्वास बसेल ?

**राजाभाऊ** : बसणारच नाही ! भल्या गृहस्था, तू स्वतःला बाबासाहेब देशमुखांचा चिरंजीव म्हणवून घेतोयस् आणि या चेकवर सही केली आहेस अरुण परांजपे या नावानं !

**अरुण** : ( शांतपणे ) ते मी खोटं नाव धारण केलंय; मला कुणी ओळखू नये म्हणून.

**राजाभाऊ** : ( अस्वस्थ होऊन ) यातलं खरं कोणतं ? हे खरं की ते खोटं . . ते खरं की हे खोटं ?

**अरुण** : मी सांगतो, अरुण परांजपे हे माझं खोटं नाव आणि मी बाबासाहेबांचा मुलगा हे माझं खरं नातं !

**राजाभाऊ** : ( चक्रावून ) छे छे, माझं डोकं गरगरायला लागलंय . . . मला थोडं पाणी आणून दे प्यायला !

**अरुण** : आणतो हं ! ( आत जातो. राजाभाऊ डोकं धरून बसतात. अरुण पाणी आणून देतो. ते पाण्याचा वास घेतात. )

**अरुण** : हे काय ?

**राजाभाऊ** : पाणीच आहे ना ?

**अरुण** : हो !

**राजाभाऊ** : ठीक आहे ! ( गटागटा पितात. ) थोडा वेळ मी तुला बाबासाहेबांचा मुलगा मानायला तयार आहे. आता सांग, स्वतःच्या वडिलांकडे, घराकडे, घरच्या वैभवाकडे पाठ करण्याचं कारण काय ?

**अरुण** : ( खोटया खिन्नतेने ) कारण ? जाऊ द्या राजाभाऊ, माझं दु:ख जाणून तुम्ही काय करणार आहात ?

**राजाभाऊ** : तुला सुख मिळवून देण्याचा प्रयत्न करीन !

**अरुण** : ( चमकून ) राजाभाऊ ?

**राजाभाऊ** : अरुण, तू मघाशी म्हणालास, मला तू तुझ्या वडिलांच्या जागी पाहातोस, मग मीही काही काळ तुला माझा मुलगा समजलो तर ?

**अरुण** : राजाभाऊ ?

**राजाभाऊ** : हे बघ, सगळं खरं खरं सांग, नि:संकोच सांग, तू जर खरं बोललास, तर याआधी जे खोटं बोललास ते सगळं विसरून जायला मी तयार आहे...

**अरुण** : मग ऐका तर... ( उगाचच शून्यात पाहण्याचा आविर्भाव करीत ) राजाभाऊ, आमच्या गावातली एक मुलगी. नाव निर्मला. नावाप्रमाणेच निर्मळ...पवित्र... वर्णानं निमगोरी, पण नाकीडोळी नीटस.. टपोरे डोळे, त्या डोळ्यांत चांदण्याचा साक्षात्कार, तरतरीत नाक, किंचित पातळ पण मोहक ओठ, ह्या ओठांच्या आत ओळीनं ओवलेला शुभ्र मोत्यांचा सर, मध्यमच उंचीची पण मजबूत बांध्याची ही निर्मला मला वेड लावून राहिली ! तिचे वडील पोस्टमास्तर. तिला फारसं शिक्षण देऊ शकले नाहीत. परंतु मुळातच निर्मला हुशार, अभ्यासातच नव्हे, गृहकृत्यात, शिवणटिपणात-सुद्धा ! आम्ही दोघं आमच्या भावी संसार सुखाचे इमले रचू लागलो. पण अचानक माझ्या वडिलांच्या रूपानं वादळ उठलं आणि आम्ही उभारलेला इमला पत्त्याच्या बंगल्याप्रमाणं कोसळला. पार जमीनदोस्त झाला ! कारण काय, तर माझ्या वडिलांनी माझं लग्न एका श्रीमंत मुलीबरोबर ठरवलं होतं... त्यांनी त्या मुलीच्या वडिलांना शब्द दिला होता. त्यांचा शब्द राखण्यासाठी निर्मलेला मी दिलेला शब्द मागं घ्यायचा ! का ? मला हे पटलं नाही... आणि एक दिवस घरातून निघून आलो !

**राजाभाऊ** : ( आपल्याच तंद्रीत— ) अगदी हाच किस्सा माझ्याही आयुष्यात घडला, अरुण... माझा एकुलता एक मुलगा उमेश थेट तुझ्यासारखा होता ! तो पाच वर्षांचा असतानाच त्याच्या आईनं आमचा निरोप घेतला... कायमचा ! पण मी त्याला आईची उणीव भासू दिली नाही. वाढवला, शिकवला आणि एक दिवस हट्ट धरून बसला— मी पायलट होणार !



**अरुण** : मग ?

**राजाभाऊ** : मी खूप समजावलं त्याला ! म्हटलं, तू माझा एकुलता एक मुलगा आहेस ! हे विमानबिमान चालवण्याच्या फंदात पडू नकोस बाबा, अष्टौप्रहर तू माझ्या डोळ्यांसमोर असायला हवास ! आपला वडिलोपार्जित बाहुल्या बनवून विकण्याचा धंदा आहे तोच संभाळ. पण पोरानं जिद्द सोडली नाही. शेवटी दिली परवानगी. काळजावर दगड ठेवून होकाराचा शब्द कसाबसा मुखातून काढला ! पायलट झाला... तसं मी त्याच्या दोनाचे चार हात करण्याच्या खटपटीस लागलो. तेव्हा ते रहस्य मला समजलं...

**अरुण** : रहस्य ? कोणतं रहस्य ?

**राजाभाऊ** : आमच्या घरातल्या वृद्ध माळ्याच्या मुलीवर त्याचं प्रेम होतं. ती मुलगी दिसायला सुरेख होती... हुशार होती...कामसू होती. पण आमच्या तोलामोलाची नव्हती. मला ही हकीगत कळताच मी खूप संतापलो. त्या बापलेकीला हाकलून दिलं आणि रागाच्या भरात मुलाला देखील चालता हो म्हणालो... उमेश गेला—तो परत आलाच नाही ! दुसऱ्या दिवशी हातात तार पडली, तो विमान अपघातात ठार झाल्याची ! तेव्हापासून या बंगलीत एखाद्या भुतासारखा एकटा राहातो मी !

**अरुण** : ( खोटया सहानुभूतीनं ) माफ करा राजाभाऊ, मी तुमच्या जखमेवरची खपली उडवली !

**राजाभाऊ** : तेच ठीक केलंस ! त्यामुळेच मी केलेला मूर्खपणा तुझ्या वडिलांनी करू नये असं मी त्यांना सांगू शकेन. तुझ्या घरचा पत्ता दे... मी आजच त्यांना सविस्तर लिहितो, त्यांची चांगली कानउघाडणी करतो.

( त्यांच्या या आकस्मिक पवित्र्याने अरुण गडबडतो. पण सुटू पहाणारा स्वत:चा तोल तो लगेच सावरतो. )

**अरुण** : राजाभाऊ, माझं ऐका ! माझ्या बाबतीत काही दिवस माझ्या वडिलांना अंधारातच ठेवणं योग्य ! मी त्यांचा एकुलता एक मुलगा आहे. पुत्रवियोगाचं त्यांचं दु:ख वाढत गेलं तरच आपलं कार्य सफल होईल ! मग मी सांगेन ती अट ते बिनशर्त कबूल करतील !

**राजाभाऊ** : ठीक आहे ! तुझ्या मनाप्रमाणे होऊ दे...